दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०१ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.५ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

# ऊसतोड कामगारांची दिवाळी
## पवार-मुंडेंनी तोडगा काढला आणि संघर्ष टळला

पुणे : राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मजुरीमध्ये ९२ रुपयांची वाढ करण्यात आलीय. माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या मध्यस्थीतून या प्रश्नावर अखेर तोडगा निघाला.पुण्यातील साखर संकुल मध्ये साखर कामगार आणि साखर कारखानदारांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली. अपेक्षित दरवाढ न दिल्यास कोयताबंद आंदोलनाचा इशारा ऊसतोड कामगारांच्या संघटनांनी दिला होता. राज्य साखर महासंघाचे पी आर पाटील, राष्ट्रीय साखर महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, साखर महासंघाचे संचालक जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील आदी बैठकीसाठी उपस्थित होते.ऊसतोड कामगारांना सध्या २७४ रुपये प्रति टन मजुरी दिली जाते. त्यात ३४ टक्के दरवाढ देण्यात येणार आहे. त्यामुळे ऊसतोड कामगारांना चालू हंगामापासून ३६६ रुपये प्रति टन इतकी मजुरी मिळणार आहे. दरम्यान मुकादम यांच्या कमिशनमध्ये देखील एक टक्क्याची वाढ करण्यात आली असून त्यांना मजुरीच्या २० टक्के कमिशन देण्यात येणार आहे.आता फक्त रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, पंकजांचा शिंदे फडणवीस सरकारला इशारादुसरीकडे, राज्यातील स्वर्गीय गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच काम अपेक्षित गतीने पुढे जात नाहीये. त्याबद्दल आपण असमाधानी असल्याचं भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी म्हटलय. या संदर्भात आपल्याला रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ येऊ नये असं देखील पंकजा मुंडे पुण्यात म्हणाल्या.ऊसतोड कामगारांच्या प्रश्नावर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीसाठी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार उपस्थित राहिल्याबद्दल पंकजा मुंडे यांनी त्यांचे विशेष आभार मानले. दरम्यान, आमदार जितेंद्र आव्हाड हे प्रभू श्रीरामाविषयी काय बोलले ते आपल्याला माहीत नसल्याचं सांगत अजय आणि त्या विषयावर प्रतिक्रिया देण्यास असमर्थता दर्शवली.



## जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर पदाचा कार्यभार संजय व्ही पडिशाला अप्पर कोषागार अधिकारी यांच्याकडे सुपूर्द

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गडचिरोली येथील जिल्हा कोषागार अधिकारी लक्ष्मण लिंगालोड यांनी सहसंचालक, लेखा व कोषागारे,नागपूर यांच्या आदेशान्वये जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर या पदाचा कार्यभार दि. २ जानेवारी २०२४ पासून चंद्रपूरचे अप्पर कोषागार अधिकारी संजय पडिशाला यांच्याकडे सोपविला आहे. त्यानिमित्य जिल्हा कोषागार कार्यालय,चंद्रपूर येथे समारोपीय कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात लिंगालोड यांनी कार्यालयातील सर्व सहकारी अधिकारी/ कर्मचारी यांना मार्गदर्शन करतांना कोषागार कार्यालयामार्फत होणाऱ्या कामकाज नियोजित वेळेत कसे पुर्ण करता येईल, याकडे विशेष लक्ष दयावे, जेणेकरुन प्रशासनात कोषागार कार्यालयाबाबत आपुलकीची भावना निर्माण होईल.



पडीशाला यांनी पदाचा पदभार स्विकारतांना कार्यालयात सहकार्याच्या भावनेने कामकाज कसे करता येईल व कामात अचुकता कशी निर्माण करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. व लिंगालोड कोषागार अधिकारी गडचिरोली यांना शाल व पुष्यगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमात अजयसिंह राठोड सहाय्यक लेखधिकारी, अनुप कुमार वाढई सहाय्यक लेखाधिकारी, एसआरफुलझेले अप्पर कोषागारअधिकारी (DCPS) या अधिकऱ्यांनी विविध विषयावर आपलेमनोगत व्यक्त केले, तर पंकज खनके सहायक लेखाधिकारी यांनी संचालन केले व आभार संदीप खापने लेखा लिपीक यांनी मानले. सदर कार्यक्रमांत जिल्हा कोषागार कार्यालयातील सय्यद, मिथीलेश सोनकांबळे, नन्नावरे कुलवे (उपलेखापाल) यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

## नवीन मोटार वाहन कायद्याविरोधात तालुका प्रशासनाला दिले निवेदन

**मूल । प्रतिनिधी**

चालक मालक संघटनेच्या वतीने बुधवारी चालक मालकांनी मोर्चा काढून प्रशासनाला निवेदन दिले. हा कायदा रद्द करण्याची मागणी या निवेदनातून केली आहे.बुधवारी दुपारी तहसिल कार्यालयात जाऊन संघटनेच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले.केंद्र सरकारने आणलेला नवीन मोटार वाहन कायदा हा वाहन चालकांसाठी अत्यंत कठोर व जुलमी आहे.संपूर्ण परिस्थितीचा विचार करून हा कायदा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.यावेळीकार्यकर्ते उपस्थित होते.मूल शहरात जय संघर्ष वाहन चालक-मालक संघटना तर्फे गाड्यांची भव्य अशी रॅली काढून सरकारचा निषेध करत निदर्शने केले. हिट अँड रन या केंद्र सरकारच्या कायद्याच्या मोटार वाहन कायदा विरोधात चालक-मालक संघटना बुधवारी रस्त्यावर उतरली.अपघात घडल्यास जखमींना मृत्यूच्या दारी सोडून पडून जाणे हे प्रत्येक मानवी मनाला पटण्यासारखे मुळीच नाही परंतु अपघात झाल्यावर वाहन चालकाच्या मनात इमानदारीने अपघातग्रस्तांना मदत करण्याची




इच्छा असतानाही विनाकारण वाहन चालकाला होणारी मारहाण वाचवण्यासाठी वाहन चालक पडून जातात स्वतःचा जीव वाचवण्यासाठी धडपड करणे हा गुण प्रत्येक प्राणी मात्रा जन्मजात असल्याने एखाद्या कठोर कायद्याचे संरक्षण ड्रायव्हरला नसल्या कारणाने ड्रायव्हर हा केवळ स्वतःच्या जीवाच्या भीतीने अपघात स्थळावरून पलायन करतो.करिता ड्रायव्हर सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करणे आणि त्यानंतर या नवीन कायद्यामध्ये कारावासाच्या कालावधी व आर्थिक दंड यामध्ये कमी करून त्यानंतरच कायदा लागू करण्याची मागणी गाडी चालक-मालक संघटनेनी केली आहे.

## १३ जानेवारीची एल्गार महासभा यशस्वी करण्यासाठी तयारी करा-ॲड.सुभाष राऊत

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ



ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी राज्यभर दौरा करत आहेत. येत्या १३ जानेवारी रोजी ना. छगनराव भुजबळ यांची ऐतिहासिक सभा बीड शहरामध्ये होत आहे या सभेचे साक्षीदार होण्यासाठी जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधवांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.धारूर येथे ओबीसी समाज बांधवांची बैठक आज आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ॲड. सुभाष राऊत बोलत होते.यावेळी बोलताना ॲड.सुभाष राऊत पुढे म्हणाले की, ओबीसी आरक्षणावर संकट आले आहे. ज्यांना ओबीसी म्हणून आरक्षण दिले जाऊ शकत नाही, असे काही लोक ओबीसी म्हणून आरक्षण द्यावे अशी मागणी करीत आहेत. त्यांची मागणी चुकीची असली तरी सरकारला या मागणीला महत्व न देता ओबीसी आरक्षणाला कसलाही धक्का लागू नये यासाठी ना. छगनराव भुजबळ लढा देत आहेत. त्यांच्या या लढाईला हातभार लावण्यासाठी बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधवांनी एकजुटीने उभे राहणे महत्त्वाचे आहे. यासाठी येत्या १३ जानेवारी रोजी बीड शहरात होत असलेल्या ओबीसी एल्गार महासभेला लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ड. सुभाष राऊत यांनी यावेळी केले.या बैठकीस राजेंद्र सत्वधर, महादेव सत्वधर, अशोक गोन्हे, अंकुश फुटाणे,लहु फुटाणे,अमित राठोड,अजय कोकाटे, विकास यादव, दिपक समर्थ, बळवंत सत्वधर, किशोर राऊत,महेश गोतावळे, रमेश सत्वधर,नाथा कापसे, रामेश्वर मनेरी, कृष्णा मनेरी, बालाजी गोंदणे, अशोक नाईकनवरे , वैजनाथ फुटाणे, मधुकर फुटाणे आदींसह ओबीसी समाजातील विविध प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. बैठकीचे सुत्रसंचलन दत्तात्रय गोंदणे यांनी केले

## मुल शहरातील नवनिर्मित इमारतींना व चौकाला महापुरुषांची नावे द्या

**मूल । प्रतिनिधी**

मुल शहरात नामदार सुधीर मुनगंटीवार यांच्या विकास निधीतून बेरोजगारांना एकत्रित व्यवसाय करण्यासाठी व्यापारी संकुल,शेतकऱ्यांना आठवडी बाजार तसेच दररोज गुजरी भरवण्यासाठी हायटेक बाजार संकुलाची निर्मिती झालेली आहे , सदर दोन्ही इमारती ह्या चिरकाळ राहणार असून येणाऱ्या पिढीना महापुरुषांची सदैव प्रेरणा मिळत राहण्यासाठी नवनिर्मित व्यापारी संकुलाला छत्रपती शिवाजी महाराज, नवीन बाजार परिसराला क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची नावे देण्यात यावी.

त्याचप्रमाणे चामोर्शी नाका चौकाला स्वातंत्र्यवीर वी दा सावरकर यांची नावे देण्यात यावी अशी मागणी एका पत्रकान्वये प्रा डॉ.किरण कापगते यांनी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार सुधीर मुनगंटीवार यांचे कडे केलेली आहे.

**प्रा.किरण कापगते यांची नामदार सुधीर मुनगंटीवार यांच्या कडे मागणी**

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात ५००१ किलोमीटर शेतपाणंद रस्ते
## 'बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते 'अभियानाचा शुभारंभ

**रस्त्यांच्या स्थितीनुसार वर्गीकरण बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते अभियानात रस्त्यांच्या स्थितीनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. यात मातीकाम पूर्ण झालेले रस्ते, मातीकाम सुरू असलेले रस्ते, नवीन प्रस्तावित रस्ते आणि मुरुमकाम पूर्ण झालेले खडीकरणाकरीता प्रस्तावित रस्त्यांचा समावेश आहे. सदर कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आले आहे.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गावागावातील पाणंद रस्ते हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विषय आहे. जिल्ह्यातील शेतकरी समृध्द करायचा असेल तर शेतीची अवजारे, बी-बियाणे व इतर कृषी निविष्ठा ने-आण करण्यासाठी पाणंद रस्त्यांची नितांत आवश्यकता आहे. शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी या रस्त्यांचे विशेष महत्त्व आहे. याचीच जाणीव ठेवून राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्ह्यात ५००१ किलोमीटरचे पाणंद रस्ते करण्याची मोहीम हाती घेतली आहे.यादृष्टीने पहिले पाऊल टाकत पालकमंत्री मुनगंटीवार आणि राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत जिल्हा कृषी महोत्सवात 'बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

चालू आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून



जिल्ह्यात ५००१ कि.मी. चे शेतपाणंद रस्ते तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये मातीकाम पूर्ण झालेले २०५५ कि.मी. चे रस्ते, मातीकाम सुरू असलेले ४०५ कि.मी. चे रस्ते आणि नव्याने प्रस्तावित ३१८२ कि.मी.चे मुरमीकरणाचे शेतपाणंद रस्ते आणि मुरमीकरण झालेले परंतु खडीकरण बाकी असलेले इतर रस्ते सुरू करण्यात येतील. यामुळे जिल्ह्यात सर्वत्र शेतकऱ्यांना त्यांना शेतावर जाण्या-येण्यासाठी बारमाही सुसज्ज असे रस्ते उपलब्ध होणार आहे. यातून शेतकऱ्यांना शेतातील माल बाजारपेठेत पोहचविणे सहज शक्य होणार आहे.पाणंद रस्त्याची सुविधा निर्माण झाल्यावर जिल्ह्यातील शेतकरी, बाजारात मागणी असलेले उत्पादन आपल्या शेतात पिकविण्याचा प्रयत्न करणार असून यातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृध्दी निर्माण होण्यास मदत होईल. बळीराजा समृद्धी मार्ग शेत पाणंद रस्ते अभियानाची प्राधान्याने अंमलबजावणी करून पावसाळ्यापूर्वी शेताकडे जाणारे रस्ते तयार करावे, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

**तालुकानिहाय शेतपाणंद रस्यांची कामे व त्याची लांबी**

**जिवती ३४८ कामे (६९६.१० कि.मी.), ६०३ कामे (६०३ कि.मी.), चिमुर ३९७ कामे (५०२ कि.मी.), सिंदेवाही ३८१ (४०१.२५ कि.मी.), ब्रम्हपूरी ३९४ (३८२.८० कि.मी.), नागभीड ३७९ (३७९ कि.मी.), मूल २६६ (३५७ कि.मी.), सावली २९० (३११ कि.मी.), गोंडपिपरी १६८ (२८१.३० कि.मी.), चंद्रपूर १५७ (२६१.३० कि.मी.), पोंभुर्णा २९२ (२४७.६५ कि.मी.), वरोरा १८३ (२०१.२० कि.मी.), बल्लारपूर १४२ (१६३ कि.मी.), भद्रावती १४६ (१४८ कि.मी.) आणि कोरपना तालुक्यात ५० कामे (६६.९० कि.मी.) असे एकूण ४१९६ कामांची संख्या असून या पाणंद रस्यो ची एकूण लांबी ५००१.८० कि.मी. आहे.**

# आठवणीतील मुरमुऱ्याचे लाडू

**कुरमुरा म्हणजेच ग्रामीण भागात याला मुरमुरे असे म्हणतात. हे मुरमुरे अनेक जणांच्या आवडीचा स्नॅक आहे. काहीजण त्याला चुरमुरे असे देखील म्हणतात. या कुरमुऱ्याचे अनेक फायदे आहेत. मुरमुरे किमतीने जरी अल्प असले तरी त्यांचे महत्त्व मौलिक आहे. कुरमुऱ्याचा आहारात समावेश हा फारच फायद्याचा असतो. आपण चांगले काहीतरी हेल्दी खाण्याचा जर विचार करत असाल तर आहारात मुरमुऱ्याचे लाडू खाल्लेच पाहिजे. आहारात दिवसातून एकातरी मुरमुऱ्याच्या लाडूचा समावेश करायलाच पाहिजे. घरातील लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना मुरमुऱ्याचे लाडू द्यायला अजिबात विसरू नये. नित्यनेमाने त्याचे सेवन हा दैनंदिनीचा भाग असायला पाहिजे.**




महाविद्यालय संपल्यानंतर मी घरी आलो. काही वेळातच दारासमोर मुरमुरे घ्या मुरमुरे असा आवाज आला. बाहेर डोकावून बघितले असता आवाज ओळखीचा वाटला. म्हणून मी त्या विक्रेत्याशी बोललो. काही दिवसापूर्वी माझ्या वडिलांच्या अक्करमासानिमित्त आमच्या घरी पूजा आयोजित केली होती. तेव्हा डहाका कार्यक्रम पार पाडण्याचे काम ज्या व्यक्तीने केले तीच हीच व्यक्ती होती .आज मुरमुरे विकायच्या निमित्ताने घरी आली. मुरमुरे, मुरमुऱ्याचे लाडू , शेंगदाण्याची गुळपट्टी, फुटाणे,लाह्या,नरडे अशा खाण्याच्या विविध वस्तू विक्रीसाठी घेऊन तो आज घरासमोर उभा होतो. त्याच्याजवळून मी काहीतरी विकत घ्यावे अशी त्याची अपेक्षा दिसली. मी फुटाणे विकत घेतले व घरात जावयास निघालो .तसा तो म्हणाला, सर मुरमुऱ्याचे लाडू घ्या ना माझी इच्छा नव्हती. परंतु माहिती नाही प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले ते लाडू बघून मलाही घेण्याचा मोह आवरला नाही. घेऊन टाकले. बऱ्याच दिवसांपासून मीही मुरमुऱ्याचे लाडू खाल्ले नव्हते किंवा खाण्याचा प्रसंगही आला नव्हता. त्याच्या विनंतीला मान देऊन म्हणा किंवा माझ्या अंतर्मनातील खाण्याची लालसा जागली म्हणून म्हणा. मी दोन पॉकेट लाडू विकत घेतले. लाडू डायनींगवर ठेवले आणि काम असल्यामुळे मी लगेच बाहेर निघूनही गेलो. दुपारी घरी परत आल्यावर पुन्हा त्या लाडूंकडे माझे लक्ष गेले. आता ते खाण्याचा मोह आवरला नाही. हातात एक लाडू पकडून खाताना जुन्या आठवणी जाग्या झाल्या.फ्लॅशबॅकमध्ये गेलो आणि बालपणीच्या अनेक आठवणींचा पट आठवायला लागला.जणू एखाद्या चलचित्राप्रमाणे सारे चित्र पुढेपुढे सरकत गेले.

माझं बालपण वरोडा या गावामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये गेलं आहे. वरोरा म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर होते. माझ्या बालपणी दर रविवारी येथे आठवडी बाजार भरायचा. तसा तो आजही भरतो. परंतु माझ्या बालपणी तो खूप छान भरायचा असं मला स्वतःला वाटते. दर रविवारचा आठवडी बाजार म्हणजे आमच्या बालगोपाळांसाठी आनंदाची पर्वणी असायची. कारण माझे आजोबा (आईचे वडील) नागोरावजी अतकर दुकानातून व्यवसाय आटोपून सायंकाळी घरी परतत असताना आम्हा नातवंडांसाठी दर रविवारी आपल्यासोबत खाऊ म्हणून मुरमुऱ्याचे लाडू घेऊन यायचे. मी घरातील लाडका आणि वयाने लहान नातू असल्यामुळे स्वाभाविकच त्या लाडवांवर माझा पहिला हक्क असायचा. आजोबा बाहेरून आले रे आले की, त्यांच्या जवळील पिशवीची पहिली तपासणी आणि त्यात असलेले लाडू आपल्या ताब्यात घेणे हा माझा दर रविवारचा छंद होता. या छंदात भागीदार म्हणून माझे मामेभाऊ बाबाराव अतकर,भैय्याजी अतकर आणि विजय अतकर, मंदाताई अतकर कधीकधी प्रकाशराव अतकर,राजूभाऊ नक्षिणे हे सुद्धा त्यात सहभागी असायचे. आम्ही सर्व आजोबांकडील मुरमुऱ्याचे लाडू आवडीने खायचो. आता आर्थिकदृष्ट्या त्या मुरमुऱ्याच्या लाडवांना आर्थिकदृष्ट्या फार मूल्य नसले तरी आजही भावनिकदृष्ट्या ते लाडू फार मौलिक आहे असे वाटते. ते लाडू देणाऱ्या आणि खाणाऱ्यांपैकी आज माझे आजोबा नागोराव आणि लहान मामेभाऊ



विजयराव आणि मावसभाऊ राजू हे आज या जगात हयात नसले तरी त्या काळातील त्यांची लाडूमधील भागीदारी आजही जशीच्या तशी आठवते. लहानपणी या लाडवांवर आम्ही सारे आवडीने तुटून पडायचो. त्या लढण्यातही एक अद्भुत आनंद असायचा. कारण गरीबीतील त्या कमतरतेमध्येही एक वेगळी श्रीमंती होती. इतक्या वर्षांनी आज हातात लाडू आले.मात्र घेतल्यानंतर त्यावर पूर्वीप्रमाणे आज तुटून पडता आले नाही. तसा गतकाळातील लाडू खाण्याच्या आनंदाची प्रचिती आली नाही आणि तसा आनंदही वाटला नाही.कारण हातात लाडू घेताघेताच माझ्यासमोर माझ्या बालपणातील लाडूचे हिस्सेकरी डोळ्यासमोर आले.जे काही चेहरे आठवले त्यातील महत्त्वाचे ते तीन चेहरे आज हयात नाही. शेवटी मन मारून एक लाडू खाल्ला आणि उर्वरित चार लाडू जैसे थे तसेच बांधून ठेवले. कदाचित ते त्यांच्या हिश्शातील असावे असे वाटले.आज हातात मुरमुऱ्याचे लाडू घेऊन खाताना वरील वर्णन केलेला प्रसंग एखाद्या चलचित्राप्रमाणे आठवला. त्याला जवळजवळ पन्नास वर्षाचा भूतकाळ लोटला असला तरी त्या बालपणीच्या आठवणी मात्र जसाच्या तशा मनात आजही कायम कोरल्या आहेत.या निमित्ताने आठवल्या.

या लाडवांचे महत्त्व आमच्या आजोबांना म्हणजे नागोरावजींना फार होते.ते आयुर्वेदाचे अभ्यासक होते.(पुढे आयुर्वेदिक औषधोपचाराचा वारसा माझे लहान मामा शामरावजी अतकर जे व्यवसायाने शिक्षक होते त्यांनी चालवला.)

आजोबा म्हणायचे

मुरमुऱ्याचे लाडू आरोग्यासाठी अतिशय उत्तम असतात. घरातील कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी तुम्हाला फक्त स्नायूंची गरज नाही तर सर्वात महत्त्वाचे म्हणजे हाडांची गरज असते. निरोगी जीवन जगण्यासाठी आपण आपल्या हाडांची काळजी घेतली पाहिजे. लहानपणी तुम्हाला ते जाणवणार नाही. पण जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा तुम्हाला ते निश्चितपणे जाणवेल. मुरमुऱ्याचे लाडू खाणे हा हाडांचे आरोग्य राखण्याचा तणावमुक्त मार्ग आहे. यामध्ये विटामिन डी, विटामिन बी २ आणि विटामिन बी १ सोबत कॅल्शियम असते. ज्यामुळे आपली हाडे मजबूत होतात. आजोबांनी मुरमुऱ्याचे लाडू खाण्याचे जे फायदे सांगितले ते त्यावेळच्या बालमनाला किती पटले, नाही पटले मला आठवत नाही. पण आज वयाची पन्नाशी उलटल्यानंतर आजोबांनी सांगितलेल्या बालवयातील त्या आरोग्याच्या रोगप्रतिकारकतेसाठी

मुरमुऱ्याचे लाडू किती महत्त्वाचे होते हे आज सर्वार्थाने पटले. एक म्हण आहे कहती है बुद्धी, लेकीन सुनता है कोन? आजची तरुण पिढी म्हाताऱ्या माणसांचे बोलणे लक्ष देऊन ऐकत नाही. कारण त्यांना ती फाजील बडबड वाटते. परंतु ते ऐकले पाहिजे.कारण म्हातारी माणसे पारंपारिक अनुभवातून आणि केस पिकलेल्या जीवनातून बरेच काही ज्ञान प्राप्त केलेली असतात. त्यांनी आपल्यापेक्षा अनेक उन्हाळे पावसाळे बघितलेले असतात. उगाच त्यांच्या डोक्यावरील केस पांढरे झालेले नसते. त्याला काहीतरी अर्थ असतो. घरातली वृद्ध म्हणजे चालते बोलते पुस्तकं असतात हे आजच्या पिढी लक्षात घेतले पाहिजे.

मागील दोन वर्षांपूर्वी आपण कोवीड सारख्या जागतिक महामारीशी लढलो आहे. या महामारीतून आपण काहीतरी शिकलो पाहिजे. आता उरलेल्या शिल्लक लोकांनी रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी जागरूक असले पाहिजे. लोकप्रतिकारक शक्तीचे महत्त्व आपण सर्वांनी त्या काळात ओळखले आहे. संतुलित आहार घेण्या व्यतिरिक्त मुरमुऱ्याचे लाडू सारख्या पदार्थाचा नाश्ता केला पाहिजे. ते आपले बाह्य जिवाणू आणि जंतूपासून संरक्षण करू शकतात. कारण ते अँटी-ऑक्सिडेंटस खनिजे आणि पोषक तत्वांनी युक्त आहे. किमतीने जरी ते अल्प असले तरी फायद्याने मात्र ते खूप श्रेष्ठ आहे. आपण जर बद्धकोष्ठतासारख्या समस्यांनी ग्रस्त असू तर मुरमुऱ्याचे लाडू खाल्ल्याने आपल्याला अनेक प्रकारचे फायदे होतात. त्यात निरोगी बॅक्टेरिया आहेत. जे बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून बचाव करण्यासाठी प्रभावी आहे. तसेच ते फायबरयुक्त देखील आहे जे आपल्याला हालचाल निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक आहे. गुळात काही आश्चर्यकारक गुण आहेत. जे त्वचेवरील सुरकुत्या आणि बारीक रेषा कमी करण्यास मदत करतात. एवढेच नाही तर हिवाळ्यात त्वचेवर चमक आणण्यासाठी देखील ते गुणकारी आहे. लाह्यात एंटीऑक्सीडेंट्स असतात जो त्वचेसाठी अत्यंत अद्भुत घटक असतो. गुळाच्या रोजच्या सेवनाने आपली त्वचा निष्कलंक आणि निर्दोष होण्यास मदत होते. हे सर्व मिश्रण मुरमुऱ्याच्या लाडूमध्ये असल्यामुळे हे लाडू खाणे हे कधीही आरोग्यदायक आहे. समाजातील लहान थोर, गरीब श्रीमंत ,शहरी ग्रामीण नागरी कुठल्याही क्षेत्रामध्ये असा मुरमुऱ्याचे लाडू हे सहज मिळणारे खाद्यपदार्थ आहे. हे लाडू खाऊन वजन कमी करण्यासोबतच ह्युमॅनिटी वाढविली पाहिजे. मुरमुऱ्याचे लाडू किमतीने कमी आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नये ते योग्य पध्दतीने खाणे ही उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे हेच यानिमित्ताने पुन्हा सांगावेसे वाटते.

# लवचिक अभ्यासक्रमाची गरज



साधकबाधक चर्चा करून बालशाळांच्या अभ्यासक्रमाला अंतिम रूप द्यावे. अन्यथा सामायिक अभ्यासक्रमामुळे बालशाळांची लवचिकता हरवली जाईल. त्याने मूळ हेतूलाच धक्का पोचेल.सर्व प्रकारच्या बालशाळासांठी लागू होईल, अशा कायद्याचा मसुदा शिक्षण विभागाने सरकारकडे सुपूर्द केल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत. महाराष्ट्रात बालशाळांसाठी कायद्याची चौकट आणण्याचा प्रयत्न करण्याची ही पहिलीच वेळ नाही.मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू राहिलेल्या प्राध्यापक राम जोशी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने १९९६ मध्ये या विषयाचा सविस्तर अभ्यास करून सादर केलेल्या अहवालातील एका शिफारशीचा आधार घेऊन सरकारने बालशाळांतील प्रवेश आणि शुल्क याबाबतचा कायदा करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु खासगी क्षेत्रातील काही शाळा या विरोधात न्यायालयात गेल्या आणि प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच, १९९७ मध्ये सरकारने हा कायद्याचा विचार मागे घेतला. यावेळी कायदा तयार करताना शुल्कावर नियंत्रण हा मुद्दा नसेल.प्रस्तावित कायद्यात बालशाळेची वेळ, भौतिक सुविधा यांबाबतच्या नियमांसोबतच बालशाळांसाठी समान अभ्यासक्रमाचा मुद्दाही आला आहे. हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. २०२० मध्ये जाहीर झालेल्या देशाच्या शैक्षणिक धोरणानुसार वय वर्षे तीन ते आठ या वयोगटासाठी अभ्यासक्रमाचा पायभूत टप्पा प्रस्तावित करण्यात आला आहे.या वयोगटापैकी सहा ते आठ या वयोगटातील मुले प्राथमिक शाळांतील पहिली व दुसरीच्या इयत्तांत शिकतात; तर तीन ते सहा वर्षे या वयोगटाची मुले राज्यातील विविध प्रकारच्या बालशाळांत. पायाभूत टप्प्याच्या अभ्यासक्रमाकडून अशी अपेक्षा आहे, की ज्या प्रकारचे अनुभवाधारित, लवचिक स्वरूपाचे शिक्षण दर्जेदार बालशाळांत मिळते, त्याचप्रकारचे शिक्षण इयत्ता पहिली व दुसरीत मिळायला हवे.म्हणजे बालशाळेत शिकण्या-शिकवण्याची अनौपचारिक पद्धत पहिली-दुसरीपर्यंत चालू राहावी आणि त्यातून मुलांच्या पुढील विकासाचा पाया पक्का व्हावा. प्रत्यक्षात मात्र या उलट घडण्याची शक्यता बरीच आहे. पहिली दुसरीतील केवळ लेखन, वाचन, गणनावर भर देणारे शिक्षण व तेथील क्रमिक पुस्तके किंवा वर्कबुक आधारित शिक्षणपद्धती सामायिक अभ्यासक्रमाच्या निमित्ताने बालशाळेत शिरण्याची शक्यता आहे. असे घडणे मुलांसाठी घातक ठरेल.म्हणूनच या वयोगटासाठीच्या अभ्यासक्रमाचा विचार गेल्या काही दशकांत कसा बदलला हे पाहणे गरजेचे आहे. १९६६ मध्ये आलेल्या कोठारी आयोगाच्या अहवालात बालशिक्षणाबाबत एक संपूर्ण प्रकरण आहे. मात्र या प्रकरणातही तीन ते सहा वर्षे या वयोगटासाठी सामायिक अभ्यासक्रम तयार करणे व्यवहार्य नाही, असे मत आयोगाने नोंदवले आहे. या मताच्या अगदी उलट दिशेला आपण आता येऊन पोचलो आहोत.याचे एक प्रमुख कारण म्हणजे 'मूल कसे शिकते' या बद्दल गेल्या काही दशकांत झालेले संशोधन. या संशोधनातून असे लक्षात आले की, या वयात आजूबाजूचे जग समजून घेण्याची धडपड मुले अखंडपणे करत असतात. मुलांचा मेंदू अतिशय वेगाने विकसित होत असतो. मुलांना मिळणारे विविधांगी अनुभव हा मेंदूच्या या विकासाचा पाया असतो. प्रत्यक्ष कृती करून, केलेल्या कृतीवर मोठ्या माणसांच्या मदतीने विचार करून ती शिकतात.हे महत्त्वाचे तत्त्व लक्षात घेऊन बालशाळेच्या अनुभवाधारित अभ्यासक्रमात मुक्तखेळ, गणिती व बोधात्मक अनुभव, भाषा व साक्षरतेचा अनुभव, सामाजिक-भावनिक विकास, कारक विकासाच्या कृती अशा विविध पैलूंचा विचार करावा लागतो. म्हणूनच या वयात केवळ क्रमिक पुस्तके किंवा वर्कबुकसारखी साधने वापरून मुलांच्या शिक्षणाची रचना करता येत नाही.

सांस्कृतिक संदर्भांचे महत्त्व

मुलांच्या शिकण्यात त्यांचा सांस्कृतिक संदर्भ महत्त्वाची भूमिका बजावतो, हेही संशोधनातून पुढे आलेले तथ्य. शिकण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे लहान मुलांनी आत्मसात केलेली तोंडी भाषा. ही भाषा त्यांच्या सांस्कृतिक संदर्भाचाच भाग असतो.मुलांच्या घरात, परिसरात जर एकापेक्षा अधिक भाषा बोलल्या जात असतील तर या वयातील मुले त्या वेगवेगळ्या भाषा सहज आत्मसात करत असतात. गुजरात आणि महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर राहणाऱ्या मराठी घरातील मूल घरातून मराठी आणि परिसरातून गुजराती अशा दोन्ही भाषा शिकतात. मात्र या भाषा मुलांना परिसरातून शिकता आल्या तरी वर्गात बसून औपचारिक पद्धतीने त्या शिकवता येत नाहीत.अशा नैसर्गिकरित्या शिकलेल्या भाषांना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात एल-१, एल-२, एल-३ अशा संज्ञा वापरल्या आहेत. मुलाने आत्मसात केलेली घरची भाषा किंवा परिसरभाषा आणि त्याच्या शाळेची भाषा ही नेहमी एकच असेल असेही नाही.औपचारिकपणे शिकण्याच्या भाषांना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात आर-१, आर-२ अशा संज्ञा आल्या आहेत.आर-१ म्हणजे मूल प्रथम ज्या भाषेत लिहायला वाचायला शिकते ती भाषा. यानंतर त्याला शाळेत ज्या भाषा शिकवल्या जातील त्यांना अनुक्रमे आर-२, आर-३ म्हणायचे. उदा. पावरी आदिवासी घरात जन्मलेल्या मुलाची घरची भाषा (म्हणजे एल-१) पावरी असते, पण ते मूल मराठी माध्यमाच्या शाळेत शिकत असेल तर त्याची आर-१ मराठी होईल. जर ते इंग्रजी माध्यमात शिकत असेल तर त्याची आर-१ ही इंग्रजी होईल.याच मुलाला शाळेत पुढे हिंदी शिकवण्यात आले तर त्याची आर-२ हिंदी होईल. शिकवताना मुलांच्या घरच्या (एल-१) आणि शाळेच्या (आर-१) भाषांतील दरी कशी सांधायची याचे स्पष्ट दिशादर्शन या वयोगटासाठीच्या अभ्यासक्रमाने करणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमात अनेकदा मुलाला नेमके काय यायला हवे, याबाबत विधाने केलेली असतात. त्यांना अध्ययननिष्पत्ती (लर्निंग आऊटकम) असे म्हटले जाते.महाराष्ट्रातील मुलांच्या स्थानिक सांस्कृतिक संदर्भामध्ये असणारी विविधता लक्षात घेऊन अशी विधाने तयार करणे गुंतागुंतीचे असले तरी गरजेचे आहे. उदा. बालशाळेतून पहिलीत जाताना 'मुलाला चित्राचे वर्णन करता येते' असे मोघम विधान पुरेसे नाही. तर वर्णन कोणत्या भाषेत आणि कोणत्या चित्राच्या आधारे याचा उल्लेख अध्ययन निष्पत्तीत असणे गरजेचे असते.येथे मुलाच्या अनुभवाचा, सांस्कृतिक संदर्भाचा मुद्दा येतो. आदिवासी गावातल्या मुलाला मॉलचे चित्र दाखवून बोलायला सांगितले किंवा शहरातल्या मुलाला शेतीच्या कामाचे चित्र दाखवले तर दोघांचे वर्णन सीमित असेल. पण चित्रांची अदलाबदल केली तर दोन्ही मुले भरभरून बोलतील. त्यामुळे चित्र कोणत्या प्रकारे निवडायचे याची स्पष्टता अध्ययन निष्पत्तीमधून मिळणे अपेक्षित असते.घरची व शाळेची भाषा वेगळी असेल तर मुलांचे बोलणे संमिश्र भाषेत असते, ते शाळेत स्वीकारावे असा स्पष्ट निर्देश अभ्यासक्रमाने करायला हवा. विविधता सामावून घेऊ शकेल अशी अभ्यासक्रमाची सामायिक चौकट निर्माण करणे हे जिकीरीचे; पण आवश्यक काम आहे. अशावेळी प्रत्यक्ष अभ्यासक्रमावर साधकबाधक चर्चा होऊन त्याला अंतिम रूप मिळायला हवे. अन्यथा सामायिक अभ्यासक्रमामुळे बालशाळांची लवचिकता हरवून त्यांच्या मूळ हेतूला धक्का बसू शकतो.बालशाळेच्या अनुभवाधारित अभ्यासक्रमात मुक्तखेळ, गणिती व बोधात्मक अनुभव, सामाजिक-भावनिक विकास अशा पैलूंचा विचार करावा लागतो.

# वित्तीय सत्त्वपरीक्षा



कोविड महासाथीच्या उद्रेकानंतर राज्यांच्या खर्चाची गुणवत्ता ढासळली. भांडवली खर्चाला कात्री लागली. हे लक्षात घेऊन राज्य सरकारांच्या खर्चासंबंधी आयोगाने काही निर्देश द्यावेत.

लोकसभा अथवा विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी संपली, की त्या काळात झालेल्या प्रचाराचे कवित्व हळुहळू लोप पावते. आश्वासनांच्या खणखणाटाचे नाद विरू लागतात आणि सत्तेवरील नव्या कारभाऱ्यांना तिजोरीचा खडखडाट भेडसावू लागतो. हा अंतर्विरोध अलीकडच्या काळात तर आणखी तीव्रतेने जाणवू लागला असून त्याचे एकमात्र कारण म्हणजे राजकीय पक्षांचा खिरापती वाटण्याचा वाढता सोस.याविषयीच्या घोषणा विविध राजकीय पक्ष प्रचंड उत्साहाने आणि अभिनिवेशाने करतात, मात्र जिच्या भरवशावर हे सगळे केले जाते, त्या बिचाऱ्या तिजोरीची स्थिती नेमकी कशी आहे, याचा विचारही केला जात नाही. या वृत्तीमुळे वित्तीय शिस्त पार कोलमडते. त्याचे परिणाम अखेर जनतेलाच सोसावे लागतात. उत्तरदायित्वाच्या व्यवस्थेचा अभाव असल्याने याला जबाबदार असणारे नामानिराळे राहतात.अशी स्थिती असल्यानेच सोळाव्या वित्त आयोगाच्या अध्यक्षपदावर प्रख्यात अर्थतज्ज्ञ अरविंद पनगढिया यांची नियुक्ती झाल्याची बातमी प्रसिद्ध होताच, हे सगळे प्रश्न डोळ्यासमोर येणे स्वाभाविक आहे. पनगढिया हे कोलंबिया युनिव्हर्सिटीत 'पोलिटिकल- इकॉनॉमी'चे प्रोफेसर आहेत.नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पहिल्यांदा पंतप्रधान झाले, त्यानंतर त्यांनी नियोजन आयोग गुंडाळला आणि 'नीती' आयोगाची स्थापना केली. तिचे पहिले उपाध्यक्ष पनगढियाच होते. २०१७ मध्ये त्यांनी हे पद सोडले, तेव्हा मोदी सरकारशी त्यांचे मतभेद झाल्याची वदंता होती. परंतु त्यानंतर 'जी-२०'साठी त्यांनी शेर्पा म्हणून काम केले होते. ते स्वतः खुल्या आर्थिक धोरणाचे, सुधारणांचे पुरस्कर्ते आहेत.यासंबंधीची भूमिका त्यांनी अनेकदा लेखांतून स्पष्टपणे मांडली आहे. या सुधारणांच्या वाटेने देश जात असताना त्यात येणारे अडथळे, खाचखळगे आणि आव्हाने यांची उत्तम जाण पनगढिया यांना आहे. त्यामुळेच आर्थिक शिस्तीला तडे जात असताना त्यांचे वित्त आयोगावर असणे हे आशा-अपेक्षा उंचावणारे आहे. कर महसुलाचा राज्यांना द्यावयाचा वाटा किती हे ठरविणे, त्यासाठी सूत्र निश्चित करणे, हे महत्त्वाचे काम तर सोळाव्या वित्त आयोगाकडे असेलच.त्याबरोबरच केंद्र व राज्य यांच्यातील वित्तीय तोल सांभाळणे ही प्रमुख जबाबदारी असेल. वस्तू व सेवा कर (जीएसटी) आल्यानंतर राज्यांना सुरवातीला जे धक्के सहन करावे लागणार होते, त्याची भरपाई करण्याची जबाबदारी जुलै २०१७ पासून केंद्राने उचलली होती. ती मुदत २०२२ मध्ये संपली. आता राज्यांना भरपाईची सोय नाही. यामुळे विविध राज्यांची वित्तीय स्थिती अधिक नाजूक आहे. या परिस्थितीवर उपाय योजावे लागतील.सर्व राज्यांना न्याय्य निधीवाटप झालेच पाहिजे, याविषयी कोणतेच दुमत होणार नाही. परंतु मिळालेल्या निधीचा विनियोग कसा केला जातो, ही बाबही तितकीच महत्त्वपूर्ण मानली पाहिजे. त्या दृष्टीने 'खर्चाची गुणवत्ता' हा मुद्दा प्रकर्षाने लक्षात घ्यायला हवा. विशेषतः कोविड महासाथीच्या उद्रेकानंतर राज्यांच्या एकूण खर्चाची गुणवत्ता ढासळली.भांडवली खर्चाला कात्री लावली गेली. हे सगळे लक्षात घेता राज्य सरकारांच्या खर्चासंबंधी काही निर्देश आयोगाने दिल्यास ते उपयुक्त ठरेल. खर्चाची गुणवत्ता याचा अर्थ उत्पादक कामासाठी निधी वापरणे. या बाबतीत देखरेख ठेवणारी व्यवस्था निर्माण करता येईल का, याचा विचार व्हायला हवा. केंद्र व राज्य सरकारांनी महसुली तूट शून्यावर आणली पाहिजे, हे उद्दिष्ट आहे.ते अजिबातच साध्य झालेले नाही. या उद्दिष्टासाठी सोळावा वित्त आयोग काही ठोस उपाय करणार का, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आणखी एक ठळक आव्हान आहे, ते पंचायत समित्यांच्या सक्षमीकरणाचे. गावाकडच्या अगदी तळातल्या ज्या लोकांविषयी राजकीय नेतेमंडळी सतत बोलत असतात, त्यांचा दैनंदिन संबंध येतो, तो पंचायत समित्यांशी.आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता अशा एक ना अनेक बाबींसाठी लोक पंचायत समित्यांवर अवलंबून असतात. या संस्थांना पुरेसा निधी मिळतो आहे की नाही, हे अतिशय महत्त्वाचे असते. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या निधीबाबतही संपूर्ण आढावा घेतला जाण्याची गरज आहे. देशाच्या सध्याच्या राजकीय-आर्थिक परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेतला तर वित्त आयोगाची भूमिका अतिशय कळीची ठरणार आहे, हे स्पष्ट होते.

३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत वित्त आयोगाला अहवाल द्यायचा आहे. तोपर्यंत निवडणुकांचा आणखी एक महासंग्राम पार पडलेला असेल. आश्वासनांची उधळण होईल. केंद्रात आणि महाराष्ट्रात कोण सत्तेवर येईल, हे आत्ताच सांगता येत नाही; परंतु कोणीही आले तरी आर्थिक प्रश्नांची जटिलता तीच राहणार असल्याने वित्त आयोगाची जबाबदारी मोठी राहील. पनगढिया यांच्या नियुक्तीकडे त्यादृष्टीने पाहावे लागेल.

# मा.आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त कडलास येथे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा.आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री साई कबड्डी अकॅडमी कडलास येथे राज्यस्तरीय ७० किलो वजनी गटाच्या कबड्डी स्पर्धा कडलास ता. सांगोला येथे दि.०१/०१/२०२४ रोजी संपन्न झाल्या सदर स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादीचे युवा नेते डॉ. पियुषदादा साळुंखे पाटील, युवा सेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख सागरदादा पाटील व तालुक्याचे उमलते नेतृत्व यशराजे साळुंखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.



या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षपदी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बाबुरावभाऊ गायकवाड हे होते याप्रसंगी सांगोला तालुका शेतकरी सहकारी सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन ड.नितीन गव्हाणे, सरपंच दिगंबर भजनावळे, युवा नेते योगेशदादा खटकाळे, माजी उपसरपंच समाधान पवार, राष्ट्रवादी चे माजी ता.अध्यक्ष चंद्रकांत शिंदे, रामदास माने सर, शरद मोरे, ड. सतीश लेंडवे, प्रशांत साळुंखे ,माजी ग्रामपंचायत सदस्य सुनीलआबा पाटील,शिवाजी पॉलीटेक्निक कॉलेजचे ज्येष्ठ विश्वस्त महादेव गायकवाड, विद्यामंदिरचे पर्यवेक्षक पोपट केदार सर, युवा नेते राहुल पाटील, वासूद गावचे माजी सरपंच प्रकाश केदार सर सांगोला शहर प्रमुख समीरदादा पाटील आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धांसाठी माजी उपसरपंच सुनीलकाका पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक सचिव व श्री छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ कडलास या संस्थेचे संचालक गिरिश पाटील सर यांच्या वतीने व साई अकॅडमी कडलास यांच्या सहकार्याने या स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्री साई कबड्डी अकॅडमी कडलास, द्वितीय क्रमांक बारामती क्रिकेट क्लब, तृतीय क्रमांक राणा प्रताप कळंब, चतुर्थ क्रमांक सेवन स्टार डोरलेवाडी ,या संघांनी पटकावले या स्पर्धेमध्ये एकूण २८ संघांनी भाग घेतला होता यामध्ये पुणे, सांगली, इस्लामपूर, बारामती, बार्शी, पळसदेव, कळंब या ठिकाणाहून संघ सहभागी झाले होते या स्पर्धा सांगोला तालुका कबड्डी असोसिएशनचे तालुका अध्यक्ष श्री सुनील भोरे सर ,प्रा.डी के पाटील सर व श्री साई अकॅडमीचे सचिन चव्हाण, अक्षय बागल, पंकज गव्हाणे, नितीन गायकवाड, विकास लिगाडे व यांच्यासह स्पर्धा खेळाडूंनी अतिशय चांगल्या पद्धतीने संपन्न झाल्या आहेत.या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी भोजन व पहिल्या चार क्रमांकाच्या विजेत्यांना चषक राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष अनिलनाना खटकाळे यांच्या वतीने देण्यात आले.

**पुरस्कार पुढील प्रमाणे.!**
**योगेशदादा खटकाळे २५ हजार ६०१,**
**समाधान कोळेकर २१ हजार ६०१,**
**सुनीलकाका पाटील १५ हजार ६०१,**
**गिरीश पाटील सर ११ हजार ६०१**
**यांच्यावतीने बक्षीस देण्यात आले.**

## पायोनियर स्कूल य. मंगेवाडी मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**सांगोला । प्रतिनिधी**

खंडोबा बहुउद्देशीय संस्थेच्या पायोनियर इंग्लिश , सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल आणि पायोनियर निवासी गुरुकुल मध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन साजरा करण्यात आला.शाळेतील मुली साडी परिधान करून आकर्षक वेशभूषेत आल्या होत्या. सावित्री बाई फुले यांच्या कार्यावर विद्यार्थीनी अर्थपूर्ण भाषणे केली. सावित्रीबाई यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान विद्यार्थीनी आपल्या भाषणातून सांगून उपस्थितांना त्यांच्या कार्याचे स्मरण घडविले.अनंत अडचणीचा सामना करून स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य शाळेच्या शिक्षिका सौ. ज्योती रणदिवे मॅडम यांनी सुंदर पोवाडा गाऊन समजून सांगितले.



अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक अनिल येलपले सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन संघर्षाची माहिती दिली. सांस्कृतिक विभाग प्रमुख आशुतोष रुपनर सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कडून प्रेरणा घेऊन ज्ञानदान करून आदर्श पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ ज्योती रणदिवे मॅडम आणि मोहन वाघमारे सर यांनी केले तर आभार सौ.वैशाली येलपले मॅडम यांनी मानले . आजचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अनिल येलपले सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभाग प्रमुख आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## सोलापूरात लवकरच ११५ नव्या ओपन जीम; आमदारांचे जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव

**सोलापूर :** जिल्ह्यात ११५ ठिकाणी लवकरच नव्या ओपन जीम उभारल्या जाणार असून तसे निधी मागणीचे प्रस्ताव आमदारांनी जिल्हा नियोजन समितीकडे दिले आहेत. युवकांचे आरोग्य आणि फिटनेससाठी निवडणुकांच्या तोंडावर का असेना आमदार सक्रिय झाल्याचे दिसत आहे.आजकालचा युवक हा आपल्या फिटनेसबाबत अधिक जागरुक असल्याचे दिसत आहे. त्यामुळे केवळ शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातूनही व्यायामशाळा आणि ओपन जीमची मागणी होऊ लागली आहे. त्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरूनही आमदारांना साकडे घातले जाऊ लागले आहे.निवडणुकीच्या काळात कामाला येणारे युवा कार्यकर्तेही ओपन जीमची मागणी करतात. त्यांच्या मागण्या आमदारांना मान्य कराव्याच लागतात. आता



तर निवडणुका तोंडावर आल्याने आमदारांकडून आपापल्या मतदारसंघात ओपन जीमचे उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत.तसे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे आले आहेत. त्याच्या तांत्रिक बाबी पाहून जागा निश्चिती करून उपलब्ध निधीनुसार क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत ओपन जीम आणि व्यायामशाळा उभारल्या जाणार आहेत.जिल्हा नियोजन समितीकडून व्यायामशाळा व क्रीडांगण विकास योजनेसाठी प्रत्येकी ३.७५ कोटी रुपये निधी राखीव ठेवला जातो. त्यातून मागणीनुसार ओपन जिमसाठी ७ लाख रुपये तर व्यायाम शाळा बांधकाम व साहित्यासाठी १४ लाख मंजूर केले जातात.जिल्ह्यातील सर्वच आमदारांकडून ओपन जीम आणि व्यायामशाळांसाठी प्रस्ताव आल्याने निवडणुकांच्या तोंडावर आमदार सक्रिय झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. व्यायामशाळांचे बांधकाम व त्यातील तांत्रिक बाजू तपासायला लागणारा विलंब याच्या तुलनेत ओपन जीमची कामे लवकरच पूर्ण होतील अशी आशा आहे.

### राजमाता जिजाऊ व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले जयती निमित्त

## माजलगाव तालुकातील फुले पिंपळगाव येथे भव्य रक्तदान शिबीर संप्पन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

फुले पिंपळगाव केसापुरी कॅम्प येथे नऊं वर्षाची परंपरपरा राखत प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी राजमाता जिजाऊ,व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले याच्या संयुक्त जन्मोत्सवा निमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन जिजाऊ, सावित्री जन्मोत्सव समिती व जानसा सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्येमाने करण्यात आले होते हा उपक्रम दि.३ जानेवारी रोजी सलग नऊं वर्षापासुन फुलेपिंपळगाव येथे राबवल्या जात आहे या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८.३०वा राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतीमेचे महात्मा फुले चौक येथे पुजन करुन अभिवादन करण्यात आले व सकाळी ९.३० वा रक्तदान शिबीराचे उदघाटन गावचे सेवा सहकारी सोसायटी चे व्हॉइस चेअरमन सर्जेराव आण्णा खामकर, केसापुरी चे सरपंच भारत साबळे,माजी सरपंच दशरथ उंबरे,माजी सरपंच अभिमन्यू साळवे भाजपा नेते बबन बप्पा सोळके ,सदधम्म सेवासंघाचे सोपान उजगरे,बहुजन समाज पार्टी चे जिल्हा अध्यक्ष ॲड अमोल डोंगरे,सेवा सहकारी सोसायटी चे संचालक डि एस दादा साळवे, एकता परिषद चे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे,यांच्या हास्ते राजमाता जिजाऊ व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले याच्या प्रतिमांचे पुजन करुन करण्यात आले या कार्यकमाला माजलगाव विधानसभेचे नेते मा.रमेश आडसकर यांची प्रमुख उपस्थित होती या शिबीरत ५७ (सत्तावन) रक्तदात्यांनी रक्तदान केले या प्रसंगी




,फेमस उद्योग समुहाचे मालक शेख शफीक भाई, कृषि उत्पन्न बाजार समिती चे संचालक अमोल जाधव, ,सेवा सहकारी सोसायटी चे संचालक सय्यद मुस्तकिम सय्यद नवाब,ग्राम पंचायत सदस्य अरुण दादा साळवे, माजलगाव पिपल्स अर्बन चे चेअरमन निशात साळवे, भारतीय बौद्ध महासभा ता अध्यक्ष गुलाब धाईजे,मातोश्री उद्योग समुहाचे मालक रामकिसन तात्या कोरडे,सौभाग्य मंगलकार्यालयाचे मालक संतोष कोरडे,आसाराम फुलगे,भाऊराव फुलगे पत्रकार शेख अन्सर,बहुजन समाज पार्टी चे हरिभाऊ साळवे ,साईभक्ती ट्रायव्हल्सचे मालक विलास सामाले , भारतीय बौद्ध महासभेचे बाबासाहेब घनघाव सुधाकर रासवे, दत्तात्रय खामकर, बौद्धाचार्य विजय साळवे, दत्तात्रय प्रधान,रमेश काटुळे ,शंकर गावडे,दत्ता अबुज गोविंद रासवे, सह रक्तदाते व गावकरी उपस्तीत होते,या कार्यक्रमा चे सुत्रसंचलन, डॉ भागवत साळवे यांनी केले ,हे शिबीर यशस्वी करण्यासाठी राजाभाऊ वजीर,सुरज खळगे, बाळु उगले अशोक साळवे,मंगेश उंबरे, नामदेव चिंचाने,विठल कुरे, आसाराम गिरगुणे, सय्यद राजु ,गोविंद खामकर,परशुराम खामकर, महादेव खामकर, ज्ञानेश्वर गिरगुणे,नवनाथ खामकर, अर्जुन फुलगे,बाळु शिंदे, सतिष उंबरे,शरद उंबरे, प्रमोद उंबरे,संदिप उंबरे,विलास उंबरे, संभाजी उंबरे, संकेत साळवे,विशाल साळवे, अभिषेक कोरडे,गोविंद कोरडे ,समाधान साळवे, सचिन ससाने, नितिन साळवे, आनंद किरवले, परमेश्वर कोरडे ,कैलास उगले ,राहुल खामकर,निळभाऊ गिरगुणे ,विष्णु कोरडे समिर सय्यद,गोपाळ गवळी वैभव खळगे.

## राज्यस्तरीय भव्य लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी शहरात शिवतेज मित्र मंडळाच्या वतीने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम नेहमी राबवले जातात. यावेळीमराठवाडा मुक्ती संग्राम दिन व भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शिवतेज मित्र मंडळ परभणी यांच्या वतीने राज्यस्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या मैदानाचे भूमिपूजन माजी मनपा सभापती आकाश लहाने यांच्या हस्ते करण्यात आले. इंदिरा गांधी स्टेडियम परभणी येथे या स्पर्धा ५ जानेवारी २०२४ ते २१ जानेवारी २०२४ या कालावधी मध्ये या स्पर्धा खेळल्या जाणार आहेत. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक १५१००० रुपये व द्वितीय पारितोषिक ७५००० रुपये व विजयचिन्ह असणार आहे. तसेच



मालिकावीर १५००० रुपये, उत्कृष्ठ गोलंदाज ७००० रुपये व उत्कृष्ठ फलंदाज ७००० रुपये व विजयचिन्ह असे विविध उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसाठी पारितोषिक माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राजेश दादा विटेकर यांच्या वतीने ठेवण्यात आले आहेत.या स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभागी होण्याचे व स्पर्धा पाहण्याचे आवाहन शिवतेज मित्र मंडळ परभणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. क्रिकेट मैदानाच्या भूमिपूजन प्रसंगी सुरेंद्र रोडगे, विक्रम बांगर, सुमंत वाघ, किरण तळेकर, सुदर्शन काळे, , अक्षय जगताप, सय्यद मोईन, सय्यद जुबेर उपस्थित होते.

**लेखा जिल्हाधिकारी शिक्षण बीड जिल्हा कार्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी. बीड जिल्हा लेखा अधिकारी शिक्षण या कार्यालयामध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी या कार्यालयातील कनिष्ठ लिपिक जनार्दन आप्पा शिंदे व कनिष्ठ लिपिक जनार्दन राऊत राम शिंदे व सामाजिक कार्यकर्ते अशोकरावजी शेजवळ यावेळी उपस्थित होते.**



# बीड येथे महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाचे कार्यालय सुरु

## लिंगायत समाजाचे नेते विनोद पोखरकर यांनी दिली भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

लिंगायत समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी महायुती सरकारच्या वतीने महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. त्या अंतर्गत बीड शहरात या महामंडळाचे कार्यालय सुरू करण्यात आहे. बुधवार, दिनांक ३ जानेवारी रोजी लिंगायत समाजाचे युवा नेते विनोद पोखरकर (अंबाजोगाई) यांनी या कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन जयंती उत्सव समितीच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वरांची प्रतिमा दिली.यावेळी बोलताना विनोद पोखरकर यांनी महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून तात्काळ सुरू केल्याबद्दल महायुती सरकारचे आभार व्यक्त केले. सध्या या कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता असून आवश्यक ती रिक्त पदे तात्काळ भरली जावीत अशी मागणी केली. लिंगायत समाज बांधवांनी महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये महामंडळाच्या कार्यालयात जाऊन महात्मा बसवेश्वरांची प्रतिमा भेट द्यावी असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी लिंगायत समाजातील गरजू बांधवांना अर्ज उपलब्ध आहेत. अशी माहिती संबंधित अधिकारी कळसणे यांनी दिली. बीज भांडवल, थेट कर्ज, वैयक्तिक कर्ज, गट कर्ज, शैक्षणिक कर्ज, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, उद्योग व्यवसाय या बाबतीत जे अर्ज करू इच्छितात त्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल असे आश्वासन विभागप्रमुख भोसले यांनी विनोद पोखरकर यांना दिले. तर लिंगायत समाजाने पहिलेले स्वप्न आज प्रत्यक्षात साकार होताना दिसले. याचा मोठा आनंद होत आहे. असे म्हणत महाराष्ट्र शासनाच्या वतीने नव्याने स्थापन झालेल्या जगतज्योती महात्मा बसवेश्वर



महाराज आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत समाजकल्याण विभाग, बीड येथे जाऊन कार्यलय व विभागप्रमुख भोसले यांचा जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची प्रतिमा भेट देऊन तसेच पेढे भरवून समस्त लिंगायत समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महात्मा बसवेश्वर उत्सव समिती अध्यक्ष विनोद सिद्रामआप्पा पोखरकर तसेच बसवेश्वर यादव, बलभीम धारेकर, सुरज बनाळे व सर्व मित्र परिवार उपस्थित होता.जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज आर्थिक विकास महामंडळ हे समाजातील सर्व युवकांसाठी नवसंजीवनी ठरणार आहे. याकरिता पाठपुरावा करून वेळोवेळी आम्हाला प्रत्येक सामाजिक कार्यात मदत व सहकार्य करून आम्ही आपल्या सोबत खंबीरपणे उभे आहोत असे सांगणाऱ्या केज विधानसभा मतदारसंघाच्या कर्तव्यदक्ष आमदार नमिताताई मुंदडा, ज्येष्ठ नेते काकाजी, युवा नेते अक्षय भैय्या यांचे लिंगायत समाजाच्या वतीने खूप – खूप धन्यवाद व आभार. तसेच महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी काही अडचण असेल तर समाज बांधवांनी (९७६५१००२०० / ९७६५०००२००) क्रमांकांवर संपर्क करा.

# उत्कर्ष कौशल्य विकसन व प्रशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रम रोजगार निर्मिती व व्यक्तिमत्व विकासासाठी पोषक-डॉ.सीमा गायकवाड

**सांगोला । प्रतिनिधी**

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संचलित उत्कर्ष कौशल्य विकसन व प्रशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रम रोज्गार्निर्मीती आणि व्यक्तिमत्व विकासासाठी पोषक आहेत.त्याचा लाभ घेऊन युवकानी विशेशतः महिलांनी सक्षम व आत्मनिर्भर व्हावे असे विचार डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयातील प्रा.डॉ.सीमा गायकवाड यानी व्यक्त केले.सांगोला शहरातील शनी मंदिरा जवळील उत्कर्ष कौशल्य विकसन केंद्रात आयोजित केलेल्या पारितोषिक वितरण सोहळा समारंभात डॉ.गायकवाड बोलत होत्या.या प्रसंगी संस्था पदाधिकारी वसुंधरा कुलकर्णी,कोषाध्यक्ष डॉ शालिनी कुलकर्णी आदि उपस्थित होते.या कार्यक्रमात शिवण वर्ग,बालवाडी प्रशिक्षण वर्ग,ब्युटी पार्लर,टली प्रशिक्षण पुर्ण केलेल्या विद्यार्थिनी व महिलांना प्रशस्ती पत्रकांचे वितरण करण्यात आले.






पुढे बोलताना डॉ.गायकवाड म्हणाल्या की प्रत्येक स्त्री च्या अंगी किमान कौशल्ये असतात.त्या कौशल्याना अशा प्रकारे योग्य प्रशिक्षण मिळाल्यास भविष्यात अनेक महिला उद्योजक सांगोल्यात तयार होतील असे गौरवोद्गार काढुन त्यानी संस्थेला आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.डॉ.शालिनी कुलकर्णी यानी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी म्हणजेच बालिका दिनी हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी व महिलांनी भविष्यात संस्थेच्या संपर्कात राहुन समाज ऋणा तून मुक्त होण्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन केले.या प्रसंगी सुमन कांबळे,विजया खडतरे,माधुरी कुलकर्णी,संजीवनी भोसेकर,अश्विनी शेन्डे,रिंश्रश्रू प्रशिक्षक मारुती महाडिक सर यानी मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांपैकी तेजस्विनी महामुनी,सानिया वसेकर ,ऋतुजा सोनलकर ,उर्मिला लाळे,शकिला काझी यानी संस्था व प्रशिक्षण वर्गाविशयी कृतद्न्यता व्यक्त केली.काहिनी रोजगार निर्मितीस प्रारंभ केला असुन समाजात सन्मान मिळत असल्याचे सांगितले.प्रारंभी बालिका दिनाचे औचित्य साधून क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले.संस्था पदाधिकारी व प्रशिक्षण केंद्राच्या मार्गदर्शीका वसुंधरा कुलकर्णी यानी प्रास्ताविक व स्वागत केले.या केन्द्राच्या माध्यमातून विविध अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण वर्ग सुरु असुन याचा लाभ विद्यार्थी वर्गानी विशेशतः महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यानी केले.तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी वर्गात रांगोळी,चित्रकला,मेंदी सजावट,कागदकाम आदि गोष्टीचे प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती वसुंधरा कुलकर्णी यांनी दिली.सदर कार्यक्रमास सेवानिवृत्त शिक्षिका मंगल लाटणे,सुधामती लोंढे,विजया खडतरे आदि उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन,आभार प्रदर्शन संध्या शास्त्री यानी,पाहुण्याची ओळख निता लाटणे यानी व सहयोग सुनिता कुलकर्णी यानी दिले.

## चांदा कृषी महोत्सवात प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर तयार करणार 'मिलेट्स उर्जा'

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वने, सांस्कृतिक कार्य आणि मस्य व्यवसाय, मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात आयोजित चांदा एग्रो २०२४ मध्ये शुक्रवार, ५ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर 'मिलेट्स ऊर्जा' म्हणजेच मिलेट्सचा वापर करून ६७५० किलो पदार्थांची खिचडी तयार करून नवा विश्वविक्रम स्थापित करणार आहेत.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), चंद्रपूर व कृषी विभाग व पशुसंवर्धन विभाग, चंद्रपूर, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने चांदा क्लब मैदान, चंद्रपूर येथे दुपारी १२ वाजता विष्णू मनोहर आत्मा संस्थेच्या सहकार्याने 'मिलेट्स'ची खिचडी तयार करायला सुरुवात करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२३ हे वर्ष 'मिलेट वर्ष' म्हणून घोषित केल्यानंतर विष्णू मनोहर यांनी मिलेटच्या प्रचार व प्रसारासाठी वर्षभर वेगवेगळ्या शहरात १२ मिलेट्सचे पदार्थ तयार करण्याचा निर्धार केला होता. त्यानुसार आतापर्यंत नागपूर, औरंगाबाद व नाशिक येथे त्यांनी मिलेटचे विविध पदार्थ तयार केले आहेत. चांदा एग्रोमध्ये विष्णू मनोहर शुक्रवारी बाजरी हे मिलेट धान्य व सर्व भाज्यांचा वापर करून पुर्णान्न असलेली खिचडी तयार करणार आहेत. त्यासाठी ते १० फूट व्यासाची, ५ फूट कढई वापरणार असून त्याकरिता सुमारे ५०० किलो लाकूड वापरला जाईल. विष्णू मनोहर यांनी याआधी दिल्ली येथे ५ हजार किलोची 'समरसता खिचडी' तयार केली असून नागपुरातील महाल भागात खिचडीला राष्ट्रीय अन्न घोषित करावे या मागणीसाठी ५ हजार किलोची खिचडी तयार केली होती. नुकतेच, वनवासी कल्याण आश्रमाच्या डीलिस्टींग कार्यक्रमासाठी त्यांनी १० हजार किलो मसालेभात व नागपुरातील खासदार सांस्कृतिक महोत्सवात विष्णू मनोहर यांनी श्री गजानन महाराजांना ६५०० किलो खिचडीचा नैवेद्य सादर केला होता.

# भाजपा महिला आघाडी ने साजरी केली सावित्रीबाई फुले जयंती

**पुलगाव । प्रतिनिधी**

दिनांक ३ जानेवारीला दुपारी ३ वाजता योग भवन पुलगाव येथे प्रा. रीता श्रीराम एटीवार महिला आघाडी अध्यक्ष पुलगाव शहर यांनी कार्यकारणी जाहीर करण्याचा व नियुक्ती पत्र वाटप ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाला उपस्थित भाजपा पुलगाव शहराध्यक्ष नितीन बडगे,महिला आघाडी वर्धा जिल्हा अध्यक्ष वैशाली येरावार, सरचिटणीस अर्चना वानखेडे, जिल्हा समन्व्यक धर्मिष्ठा सिंगर, वर्धा जिल्हा महामंत्री माधुरी इंगळे,बुथ विस्तारक मनोज वालदे व महामंत्री पुलगाव शहर. रेविता बांगरे प्रामुख्याने हजर होते.यांचे शुभ हस्ते नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले व सर्व कार्यकारणी जाहीर करण्यात आली.




## भाजपा जिल्हा उपाध्यक्षपदी मधुकरराव रेवतकर

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील भारतीय जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते, माजी सैनिक, यशस्वी व्यापारी, धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर राहणारे मधुकरराव रेवतकर यांची भाजपा जिल्हा उपाध्यक्षपदी जिल्हा अध्यक्ष सुनिल गफाट यांनी नियुक्ती केली आहे.

मधुकरराव रेवतकर यांच्या निवडीबद्दल भाजपा प्रदेश सदस्य राजीव बत्रा,ओबीसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते, जिल्हा अध्यक्ष मंगेश झाडे, उपाध्यक्ष संदीप बोरकुटे,शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे, विधानसभा प्रमुख दिपक फुलकरी,भाजपा शहर अध्यक्ष नितीन बडगे,सरचिटणीस सुधिर बांगरे, शिल्पा ठाकूर,गजानन गालपेल्लिवार, मनोज वालदे, व्यापारी आघाडीचे मदन बढिये, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश सचिव शकील खान इत्यादीनी अभिनंदन केले आहे.



# उपमुख्यमंत्री फडणवीस यांना भेटले बीडचे शिष्टमंडळ

## नारायणगड विकासाचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार

**बीड । प्रतिनिधी**

धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणार्या श्री क्षेत्र नारायणगड संस्थांनचा विकास आराखडा २०१८ मध्ये मंजूर करण्यात आला होता. याकरिता स्व.विनायक मेटे यांनी पाठपुरावा केला होता. यातील २५ कोटीपैकी २३ कोटी रुपये अद्याप मिळाले नव्हते. याबाबत शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फ डणवीस यांची भेट घेताच त्यांनी हा निधी तत्काळ उपलब्ध करुन देण्याचा शब्द दिल्याने कामे मार्गी लागणार आहेत.



बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र नारायणगड येथे दर एकादशीला तसेच आषाढी, कार्तिकीला लाखो भाविक दर्शनासाठी येतात. या भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यारिता तसेच गडाच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यासाठी तत्कालीन आ.विनायक मेटे यांनी पाठपुरावा केला होता. त्यानुसार २५ कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला होता. मात्र २०१८ पासून यातील केवळ दोनच कोटी रुपये मिळाले होते. उर्वरित २३ कोटी रुपये तत्काळ मिळावेत याकरिता आ. सुरेश धस, परमेश्वर येवले, विश्वस्त अनिल दादा जगताप, बळीराम गवते, गोवर्धन काशीद सि ए बी.बी.जाधव भक्त सचिन बागवाले यांनी उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी फडणवीस यांनी हा निधी उपलब्ध करुन देण्याचा शब्द दिला असून आता गडावरील कामे मार्गी लागू शकणार आहेत.

# राजेंद्र मस्के यांच्या मध्यस्तीने अन्याय ग्रस्त माने कुटुंबाचे उपोषन मागे

## जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी दिले कारवाईचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील भिलेगाव येथील अल्पवयीन अज्ञान मुलीवर दि ०४ आक्टोंबर २०२३ रोजी लैंगिक अत्याचार करण्यात आला. या प्रकरनात सिरसाळा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद असून, फरार आरोपींना अटक करावी. पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंद करून, कडक कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी पिडीत कुटुंब २६ डिसेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले होते.आज या पिडीत कुटुंबाचे निवेदन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हाधिकारी सौ. दीपा मुधोळ - मुंडे यांना देऊन घटनेचे गांभीर्य सांगितले. जिल्हाधिकारी यांनी आरोपींना अटक करून कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले. पिडीत कुटुंबियांनी मस्के यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेतले. भिलेगांव शेत वस्तीवरील दिनांक ०४ आक्टोंबर २०२३ रोजी अज्ञान मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये अज्ञान मुलगी गर्भवती केली असल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. सदरील प्रकरणात मुलीचे अल्पवय लक्षात घेऊन पोक्सो लैंगिक अत्याचार अंतर्गत गुन्हा नोंद झाला नाही. व ३७६ सह अन्य कलम न लावल्याने पिडीत कुटुंब जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले होते. भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या विनंतीनुसार जिल्हाधिकारी यांनी कारवाईचे दिलेले आदेश लक्षात घेऊन या कुटुंबाने उपोषण मागे घेतले आहे.



# मारवाडी येथील त्या तरुणाची आत्महत्याच

## ग्रामस्थांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील मारवाडी येथील त्या तरुणाचा खून नसून आत्महत्याच आहे असे लेखी निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक यांना मारवाडी येथील ग्रामस्थांनी दिनांक ३ जानेवारी बुधवार रोजी दिले. तालुक्यातील मारवाडी येथील कल्याण गणेशराव देशमुख या तरुणाने घरगुती तणावास कंटाळून राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दिनांक १९ नोव्हेंबर रविवार रोजी घडली होती. परंतु आत्महत्याग्रस्त व्यक्तीच्या नातेवाईकाकडून पोलीस प्रशासनाला ही आत्महत्या नसून हत्या आहे असे सांगितले जाते व या घटनेच्या तपासासाठी पोलीस प्रशासन गावकऱ्यांची चौकशी करत असल्याने गावकरी त्रस्त झाले आहे असे या निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे. कल्याण देशमुख यांनी आत्महत्या केली असून कल्याण देशमुख याचे वडील गणेश राव देशमुख यांनी बोरी पोलीस ठाण्यात शेतकरी आत्महत्या असल्याची फिर्याद नोंदविली आहे तरी देखील या आत्महत्याला नातेवाईकाकडून हत्या का म्हणली जाते या मागचे कारण काय आहे असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणात लक्ष घालून या आत्महत्येचा प्रश्न सोडवावा अशी ग्रामस्थांकडून निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे या निवेदनावर लक्ष्मण देशमुख, रविकांत देशमुख, शिवाजी देशमुख, गंगाधर देशमुख प्रमोद देशमुख, राजाभाऊ देशमुख, प्रभाकर देशमुख, विश्वास देशमुख, माणिक देशमुख, सोनेराव देशमुख, दीपक देशमुख यांच्यासह स्वाक्षऱ्या आहे.

# विद्यासागर हायस्कूल मध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील मौ. करंजी येथील विद्यासागर हायस्कूल मध्ये दिनांक ०३ जानेवारी रोजी विद्येची जननी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महिला शिक्षण दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. ज्ञानोबा इंगळे यांच्या प्रेरणेतून अनेक विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशात आल्या होत्या. त्या मुळे शालेय परिसर शोभून दिसत होता व उत्साह संचारला होता. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. रमेश वरकड हे होते. तर यावेळी वर्ग इयत्ता पाचवी मधून स्मिता चिखले, अनुष्का जाधव, राधिका जाधव, संजना ढगे, शारदा जाधव, संध्या जाधव, गोविंद थोरवट, तसेच वर्ग इयत्ता सहावी मधून श्रुतिका जाधव, राधिका जाधव, गायत्री नरवडे, मुंजा पितळे, परमेश्वर डोने, समर्थ जाधव, इयत्ता इयत्ता सातवी मधून श्रेया जाधव, ऋतुजा पोंडे, अश्विनी कुरे, पूनम कांबळे, आदित्य पितळे, चैतन्य पितळे, वैदेही निर्मळ आणि इयत्ता आठवी मधून किरण निर्मळ, रोशनी निर्मळ, युवराज घायाळ या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला तर या वेळी अनेकांनी त्यांचे गुण गौरव करणारे गीत आणि पोवाडे गायले तसेच त्यांच्या जीवनावर आधारित विविध कविता सादर केल्या संपूर्ण शालेय परिसर सावित्रीबाईंच्या विचारांनी भारावून गेला होता.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. लक्ष्मण वाघमारे, श्री. लक्ष्मण गाजुलवार, श्री. ग्यानोबा मुरमुरे, श्री. रेणुकादास मुळे, श्री. आनंद असोलेकर, श्री. मधुकर शिंदे यांनी परिश्रम घेतले. तर यावेळी श्री. ज्ञानोबा इंगळे यांनी मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियाना विषयी विद्यार्थ्यां मध्ये जागृती निर्माण केली व आपला सहभाग देण्यास प्रेरित केले तसेच माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथरावजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना लिहिलेल्या पत्रांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर ते पत्र सर्व विद्यार्थ्यांसमोर प्रकट वाचन करण्यात आले आणि त्या नंतर सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.या वेळी योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले शेवटी उपस्थितांचे आभार सांस्कृतिक विभागाच्या वतीने मानण्यात आले. या वेळी कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थ्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .